VOL- IX | ISSUE- VIII | AUGUST | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# मुक्तेश्वरी महाभारतातील द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगातील कल्पनाविलास आणि सामाजिक संदर्भ

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

मुक्तेश्वर सभापर्वाच्या पंधराव्या अध्यायात द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग मुक्तेश्वरांनी चित्रित केला आहे. महाभारतातील सर्व घटनांना गतिमान करणारी महत्त्वाची घटना म्हणजे द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग होय. या अध्यायाच्या 290 ओव्या आहेत. पांडव द्युत खेळले व सर्वस्व हरले. शकुनीच्या कपट फासामुळे पांडवांचा द्युतात पराभव झाला. हत्ती, रथ, घोडे, दास, दासी, अगणित संपत्ती हरल्यानंतर धर्मराजाने द्युतात चार भावांना लावले तरी पण तो हरला शेवटी स्वत:स द्युतात लावले. त्यातही धर्मराज हरला. शेवटी द्रौपदीस बोलावले तिलाही धर्मराजाने डावात लावले आणि द्रौपदी कौरवांची दासी झाली. तेव्हा दुर्योधनाने द्रौपदीला सभेत आणण्यासाठी प्रतिकारभिस पाठवले द्रौपदीने सभेत येण्यास नकार दिला त्यानंतर दुर्योधनाने दु:शासनास द्रौपदीकडे पाठविले. दु:शासनाने अतिशय निर्दयपणे द्रौपदीला फरपटत सभेत आणले आणि तिचे वस्त्रहरण केले. त्यापूर्वी द्रौपदीने धृतराष्ट्र, भीष्म, द्रोण, विदुर या सर्वांची करूण प्रार्थना केली. या संकटातून सोडवावे अशी विनंती केली. पण काहीच उपयोग झाला नाही. पांडवांनाही उद्देशून द्रौपदीने विनवणी केली पण पांडव हातबल झाले. शेवटी दु:शासनाने तिचे वस्त्रहरण केले. त्याप्रसंगी द्रौपदीने एकाकी अवस्थेत कृष्णाचा धावा केला आणि कृष्णाने द्रौपदीला वस्त्रे पुरवून तिची लाज राखली. हा द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग मुक्तेश्वराने विविध कलागुणांनी नटवला आहे. प्रसंग वर्णने, व्यक्तीचित्रे, संवादकौशल्य, उपमा, रूपके इत्यादी काव्यगुणांनी हे अख्यान समृद्ध केले आहे.

मुक्तेश्वर कृत सभापर्वातील पंधराव्या अध्यायात मुख्य प्रसंग द्रौपदी वस्त्रहरणाचा आहे. कौरवांनी द्युतात द्रौपदीला जिंकले आणि द्रौपदी कौरवांची दासी झाली. दुर्योधनाने द्रौपदीला भर सभेत आणण्यासाठी दु:शासनाला पाठवले पण द्रौपदीने मी रजस्वला व एकवस्त्र आहे तसेच जो धर्मराज जिंकला गेला आहे. त्यास मला पणाला लावण्याचा अधिकारच काय असे द्रौपदीने म्हटले तेव्हा दुर्योधनाने प्रतिकामीस नपुसक म्हणून त्याचा अपमान केला आणि दु:शासनास द्रौपदीस घेऊन ये म्हणून सांगितले. तेथून पुढील सर्वच वर्णनात मुक्तेश्वराने जिवंतपणा ओतला आहे. एकामागून एक भाव व प्रसंग कवीने आपल्या डोळ्यासमोर उभे केले आहे. दु:शासनाने अतिशय उद्धटपणे द्रौपदीशी संभाषण केले व तिला फरपटत सभेत आणले. आपला जीव वाचविण्यासाठी द्रौपदी अंत:कुरातील वृद्ध स्त्रियात लपून बसली. पण तिथेही प्रवेश करून उन्नत दु:शासनाने तिला भर दरबारात आणले. त्याप्रसंगी द्रौपदीने किंकाळी फोडली. सुरुवातीला तिने सभेतील सर्व लोकांना डोळ्यातून पाणी आणून विनंती केली पण काहीही उपयोग झाला नाही. एखाद्या वाघाने जसे गाईला धरून आपल्या गुहेत आणावे त्याचप्रमाणे पापी दुर्योधनाने द्रौपदीस राजसभेत आणले. त्याप्रसंगी द्रौपदीने करूण किंकाळी मारली. त्याप्रसंगी सर्व पृथ्वी थरारली,

आकाशातील चंद्र, सूर्य, तारे डळमळून खाली पडतात की, काय? असे वाटत होते. द्रौपदीच्या किंकाळीने कैलास पर्वत डळमळीत झाला. वैकुंठीचा कळस हलला. सर्व ऋषीमुनी कौरवांना शाप देऊन भस्म करण्यास उद्युक्त झाले. पण ब्रह्मदेवाने सर्वांची समजूत काढली. श्रीकृष्ण आपल्या लिलेने द्रौपदीचे संकट निवारण करील असे म्हटले. मुक्तेश्वर आणि द्रौपदीच्या दु:खाचे वर्णन करताना त्या दु:खामुळे त्रैलाक्यातील सर्व महाशक्ती द्रौपदीच्या पाठीशी कशा होत्या ते दाखविले. भर सभेत द्रौपदी मान खाली करून रडत होती. तिच्या अश्रूंनी भूमी भिजून चिंब झाली. दरबारातील संत, महंत यांना देखील अतिशय दु:ख झाले. द्रौपदीच्या दु:खाने झाडावरील पक्षी देखील रडू लागले, पर्वत देखील दुभंगून गेले, सर्वांच्या डोळ्यांना धारा लागल्या पण शकुनी, कर्ण व दुर्योधन यांना मात्र आनंदाच्या उकळ्या मावत नव्हत्या ते सर्वजण गदगदा हसत होते, एकमेकांना टाळी देत होते आणि पहा पहा द्रौपदीचे सौंदर्य बारकाईने पहा तिची मांडी, तिचे डोळे, तिची कंबर, तिचे स्तन, तिचे ओठ किती सुंदर आहेत, किती कोमल आहेत ते पहा असे परस्परांना म्हणत होते. कर्णाने तर द्रौपदीस तू आज पासून दुर्योधनाची दासी झालीस असे म्हटले. परस्पर विरोधी प्रसंग व संवाद रेखाटून कवीने हा प्रसंग व संवाद हृदयविदारक केला आहे. एकीकडे भर सभेत द्रौपदीला आणून तिची जी विटंबना चालू होती त्यामुळे सभेतील सज्जन लोकांना अतिशय वाईट वाटत होते. त्यांच्या डोळ्यात अश्रू गोळा झाले तर त्याच सभेत कर्ण व शकुनी हे द्रौपदीच्या सौंदर्याची निर्लज्ज चेष्टा करत होते व हसत होते. हे दृश्य पाहून भिमास अतिशय राग आला. दुर्योधनाला मारण्यासाठी भिमाने गदेला हात घातला. पण धर्मराजाने त्याला समजावले तरी पण भिमाचा राग अनावर झाला आणि त्याने धर्मराजालाच रागावले. धर्मराजाचे हात जाळून टाकण्याची भाषा करू लागला. पण अर्जुनाने त्यास आडवले. दु:शासनाने द्रौपदीचे सुंदर केस हातात घेऊन तिला झोके देण्याचा प्रयत्न केला. त्यात तिचा पदर ढळला तरी पण आपल्या एका तळहाताने तिने आपले वक्षस्थळ झाकले. तरी पण द्रौपदीचे केस धरून दू:शासन तिच्या शरीरास हिसके देत होता. त्याप्रसंगी द्रौपदीने मोठा विलाप केला. त्या सभेत भीष्माचार्य, द्रौणाचार्य अशा मोठ्या व्यक्ती होत्या. त्यांच्याकडे पाहून करून शब्दात द्रौपदी रडली पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. स्वतः धर्मराजानेच आपण द्रौपदीला हरून बसलो आणि द्रौपदी कौरवांची दासी झाली असे म्हटल्याने आमचे काहीही चालत नाही असे भीष्माचार्याने म्हटले. पण विकर्णाने मात्र द्रौपदी जिंकली गेली नसून ती पांडवांचीच पत्नी आहे. अशाप्रकारे धीटपणे आपले मत मांडले. विकरणाच्या बोलण्यावर मात्र कर्णाने तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली आणि पांडव हरले असून द्रौपदी कौरवांची दासी झाली हे सत्य आहे. असे कर्ण म्हणाला, द्रौपदी पाच पांडवांची स्त्री म्हणजे एक प्रकारची वेश्याच आहे. तिला आणि तिच्या पतींना नग्न करा असे कर्ण म्हणाला. कर्णाचे भाषण ऐकून दुर्योधन कामातूर झाला. त्याने भर सभेत द्रौपदीला मांडी दाखवली. त्याबरोबर भीम रागावला आणि कधीतरी आपल्या गदेने दुर्योधनाची मांडी फोडून त्याचा नाश करीन अशी त्याने प्रतिज्ञा केली. तरी पण द्रौपदीस दुर्योधन मांडीवर बसण्यास आग्रह करत होता. त्यावेळी द्रौपदी संतप्त झाली व तिने दुर्योधनाला शाप दिला की, लवकरच भिमाच्या गदेशी तुझ्या मांडीचा विवाह होईल व रणमंचकावर तू प्राणत्याग करून झोपून राहशील. हा शाप ऐकताच दुर्योधनास राग आला व तो म्हणाला तिची जीभ हासडा, तिच्या शरीराचे तुकडे तुकडे करा पण त्यापूर्वी हीच्या पाचही पतीसमोर हिला नागवी करा दु:शासनास तो म्हणाला पाहतोस काय हीचे वस्त्रहरण करून हिला नागवी कर असे म्हणताच दु:शासनाने वस्त्रहरणाची कृती केली. कवी लिहितो वाम हस्त तो वेणिये। सव्यसूदला वस्त्र निरिये। इतुक्यामाजी द्वारावतीये। मनोदूत धाडीला। दु:शासनाने वेणीत डावा हात घातला व उजव्या हाताने त्याने द्रौपदीच्या वस्त्राच्या निऱ्या फेडण्यास सुरुवात केली. त्या सरशी हाताश झालेल्या द्रौपदीने आपला मनोदूत द्वारकेस पाठविला.

मुक्तेश्वराने अतिशय जलद गतीने अनेकांच्या प्रतिक्रिया दाखविल्या. पांडव, कर्ण, विकर्ण, भीष्माचार्य, दुर्योधनाच्या भिन्नभिन्न स्वभावांच्या व्यक्तीची त्याप्रसंगीची मनस्थिती कवीने सुंदर शब्दात रेखाटली आहे आणि शेवटी दुर्योधनाचा राग उसळला व द्रौपदी वस्त्रहरणास सुरुवात झाली. आपणास याप्रसंगी कुणीही साहाय्य करीत नाहीत आपले पती देखील दुर्बल ठरले आहेत. अनेक वडीलधाऱ्या माणसांचे देखील पापी दुर्योधनासमोर काहीही चालत नाही. हे पाहून द्रौपदीने कृष्णाचा धावा केला, ती म्हणाली हे कृष्णा आता तूच माझा पाठीराखा आहेस. तूच माझी माता पिता, पाठची बहीण सर्व काही तूच आहेस धाव-धाव पूर्वी अनेक भक्तांनी तुझा धावा केला व त्यांचे संकट निवारण तू केलेस तेव्हा आजच तुला काय झाले. तू अहिल्येचा उद्धार केलास, पिंगळा वेश्येचा उद्धार केलास मग माझ्या बाबतीत असे का? कृष्णा इतका निष्ठुर होऊ नकोस, यापूर्वी दुष्टांचा नाश करून भक्तांचे रक्षण करण्यासाठी तू अनेक अवतार घेतले. आज हे दुःशासन, दुर्योधन मला छळत आहेत. त्यांचा नाश कर व माझे रक्षण कर तेव्हा हे कृष्णा तू कृपेची सावली कर. अशा तऱ्हेने अनेक करून शब्दांनी द्रौपदीने कृष्णाचा धावा केला आणि हा धावा द्वारकेत आपल्या महालात सुवर्ण मंचकावर झोपलेल्या कृष्णाच्या कानात शिरला आणि लगेच कृष्ण खडबडून जागा झाला. त्यांनी ओळखले की, दुःशासन द्रौपदीच्या अंगास झोंबत आहे व कृपाळू कृष्ण लगेच द्रौपदीची पाठ राखणी करण्याकरता कौरव सभेत आला. कृष्ण सभेत येताच द्रौपदीस आनंद झाला. विदुर, पांडव, भीष्म यांनाही आनंद झाला. दुर्योधनाने पुन्हा एकदा दुःशासनास द्रौपदीचे वस्त्रहरण करण्याची आज्ञा केली. त्यासरशी दुःशासनाने तिचे वस्त्र फेडले पण चमत्कार असा झाला की, पहिले वस्त्र फेडताच त्या जागी लगेच दुसरे दिव्य वस्त्र दिसू लागले अनेक भरजरी वस्त्रे एकानंतर एक दिसू लागली कितीही वस्त्रे फेडली तरी पुन्हा तिथे नवे वस्त्र दिसत होते. मुक्तेश्वरांनी मोठ्या विस्ताराने अनेक वस्त्रांची वर्णने केली आहेत भक्तांच्या संकटात धावून येणाऱ्या कृष्णाने द्रौपदीला अनंत वस्त्रे पुरविली. तिचे शरीर कोणालाही दिसू दिले नाही शेवटी कृष्णाने आपला पितांबर पूरवीला त्या पितांबरास दुःशासनाला स्पर्श करता आला नाही कारण त्यातून अग्नीच्या ज्वाला बाहेर पडत होत्या. त्यामुळे दुःशासन घाबरला वस्त्रहरण थांबले पण त्याप्रसंगी यज्ञ शाळेत घुबड घुमू लागली, सभेतील सर्व नागरिक द्रौपदीची स्तुती केली, तर कौरवांची निंदा करू लागली. भीमाने दुःशासनाचे हात उपटून त्याच्या वक्षस्थळाला छिद्रे पाडण्याची घनघोर प्रतिज्ञा केली. त्यानंतर तेथील दरबारातील सर्व राजे लोक घाबरून गेले कारण रक्ताचा पाऊस पडत होता. कुत्रे व कोल्हे राजमहाला समोर रडत होते. हे पाहून गांधारीने रडण्यास सुरुवात केली. धृतराष्ट्र देखील हताश झाला व त्यांनी पांडवांना जवळ बोलावून त्यांचे राज्य परत केले. द्रौपदी व पांडवांना दास्यत्वातून मुक्त केले. अर्थात धृतराष्ट्राचे हे वागणे कर्ण दुर्योधनाला मानवले नाही. त्यांनी काहीतरी करून पांडवांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान केले. पण तात्पुरते का होईना पांडव द्रौपदीसह रथात बसून सुखाने त्यांच्या राजधानीत म्हणजेच इंद्रप्रस्थास आले.

थोडक्यात द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगात कवीने भावभावनांचे रंग भरले. प्रसंग एकच असला तरी त्या प्रसंगाकडे भिन्न भिन्न स्वभावाच्या व्यक्ती कोणत्या पद्धतीने पाहतात व त्या पार्श्वभूमीवर तो प्रसंग किती उठावदार होतो हे मुक्तेश्वराच्या वर्णनातून पाहावयास मिळते. द्रौपदीचा करूण विलाप दगडालाही पाझर फोडणारा आहे. पण कर्ण, दुर्योधन या पाषाणांना पाझर फुटला नाही असे कवीने दाखविले. धृतराष्ट्र स्वतः राजा असूनही आपल्या नीच मुलांना त्याला आडवता आले नाही. विदूर हा काहीतरी थोडे धाडस करतो पण त्यासही गप्प बसविले जाते. विकर्णाने न्याय भूमिका मांडली. पण त्यास मूर्खात काढले. अशा तऱ्हेने वाईट वेळ येतात भल्याभल्यांचे शहाणपण चालत नाही हे कवीने चढत्या क्रमाने दाखविले. यातच या प्रसंगाचे सामर्थ्य व जिवंतपणा सामावलेला आहे.

VOL- IX ISSUE- VIII AUGUST 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगात मुख्य व्यक्तिरेखा द्रौपदीची आहे आणि या मध्यवर्ती व्यक्तिरेखेच्या अनुषंगाने भीम, विकर्ण, दुर्योधन, दु:शासन यांच्या व्यक्तिरेखा मुक्तेश्वरांनी चित्रित केले आहेत. अर्थात महाभारतासारख्या भव्य कलाकृतीत या व्यक्तिरेखा ज्या पद्धतीने वाचकांसमोर येतात. त्या मानाने सभापर्वाच्या एका छोट्या प्रसंगात त्यातील व्यक्तींचे परिपूर्ण चित्र येणे शक्य नाही. तरीपण मुक्तेश्वराने या प्रसंगातील संवादातून आणि संघर्षातून त्यातील व्यक्तीवर प्रकाश टाकला आहे. या आख्यानात द्रौपदी ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. आपल्या सौंदर्याने द्रौपदीने अनेकांना मोहित केले. म्हणूनच द्रौपदीला जिंकताच तिला दुर्योधनाने भर सभेत आणण्याची आज्ञा केली. सौंदर्याचे वरदान लाभलेली द्रौपदी भर सभेत येताच केविलवाणी झाली. एखाद्या हरीणीप्रमाणे तिचे चित्त विचलित झाले. तिला फरपटत दु:शासनाने भर सभेत आणले तेव्हा ती संभ्रमित झाली. आपल्या पाचही पतीसमोर आपली विटंबना होत आहे हे पाहून तिला रडू कोसळले. कुणीही आपल्याला या संकटातून वाचवू शकत नाही हे पाहून रडू कोसळले व तिने अतिशय दीनपणे एवढ्या मोठ्या बलाढ्य पांडवांची पत्नी पण तिचे केस पकडून तिच्या शरीरास झोंबत दु:शासनाने तिला सभेत आणले. वास्तविक त्यावेळी ती राजस्वाला व एकवस्त्र होती पण तिच्या अडचणीची परवा न करता भर दरबारात तिची विटंबना केली. दुर्योधनाने तिला ये मांडीवर बस असे बोलले त्यामुळे तर एखादी प्रलय कालिनी वीज चमकावी त्याप्रमाणे द्रौपदी रागाने भडकली व तिने शाप दिला की एके दिवशी तुझ्या मांडीचे व भिमाच्या गदेचे लग्न लागणार आहे मग त्यावेळी खुशाल रणांगणावर निद्रा कर. त्या निद्रेतून कधीच जागा होणार नाहीस. या शापातून दुर्योधनाने दु:शासनास द्रौपदीला नग्न करण्याची आज्ञा दिली. त्याप्रसंगी द्रौपदीने कृष्णाचा धावा केला. त्यात तिचे श्रीकृष्ण प्रेम दिसते. टाहो फोडून द्रौपदीने कृष्णास पाचारण केले. अनेक सुंदर सुंदर विशेषणाने कृष्णाच्या कृपेला द्रौपदीने जागृत केले आणि खरोखरच कृष्ण जागा झाला आणि त्यांनी द्रौपदीस अनेक वस्त्रे पुरविली. द्रौपदी ही सामान्य स्त्रीप्रमाणे नव्हती तर ती एक तेजस्वी स्त्री होती. म्हणूनच या प्रसंगाच्या शेवटी धृतराष्ट्राने तिचे सांत्वन केले. तिच्या अपमानामुळे भविष्यकाळात फार मोठे अनिष्ट ओढवले हे लक्षात आल्याने द्रौपदीच्या विनंतीवरून धृतराष्ट्राने पांडवांना कौरवांच्या दस्त्यातून मुक्त केले व त्यांना त्यांची शस्त्रे परत केली. त्यांचे राज्य त्यांना परत केले. अशा तऱ्हेने द्रौपदी एक लावण्यवती तेजस्विनी श्रीकृष्ण भक्त अशी प्रतिमा मुक्तेश्वराने रेखाटली आहे. याशिवाय काही ओझरत्या व्यक्तिरेखा त्यात आढळतात. त्यातल्या त्यात एक उठावदार व्यक्तिरेखा म्हणजे भिमाची व्यक्तिरेखा आहे. द्रौपदीला भर सभेत आणून तिची विटंबना होताना भिमाला अतिशय राग आला. भिमाचा स्वाभिमान उफाळून आला. द्रौपदीच्या सौंदर्याची उपहासपूर्ण चर्चा ऐकून तर त्यास अतिशय संताप आला. त्याने आपल्या मुठीत गदेला घेतले आणि या सर्व कौरवांचा नाश करण्याची प्रतिज्ञा केली. धर्मराजाने त्यास समजाविले पण उलट तो धर्मराजावरही रागावला. भीम सहदेवास म्हणाला सहदेवा अहित आणि आन म्हणजे धर्मराजाचे हे दोन हात जाळून टाक कारण याच हाताने द्युत खेळून धर्मराज यांनी द्रौपदीला पणाला लावले व त्यामुळे द्रौपदीची विटंबना झाली. अर्थात अर्जुनाने समजावून सांगितल्यावर भिमाचा राग तात्पुरता शांत झाला. पण द्रौपदीची विटंबना त्यास पाहवत नव्हती. पाचही पांडवात फक्त भीम अस्वस्थ झाला आहे असे कवीने दाखविले आहे. अतिशय सुंदर द्रौपदीला पापी दुर्योधनाने आपली मांडी उघडी करून दाखविली तेव्हा मात्र भीम खरोखरच रागावला व कधीतरी या गधेने तुझी मांडी चूर्ण, चूर्ण करीन अशी प्रतिज्ञा भिमाने केली व त्या प्रतिज्ञेस द्रौपदीनेही अनुमोदन दिले. त्यामुळे एकूणच सभेत भयभीत वातावरण निर्माण झाले. थोडक्यात द्रौपदी वस्त्रहरण होताना माना खाली घालून बसलेल्या पांडवापैकी एक त्या भिमाचीच प्रतिमा कौतुकास्पद होती. द्रौपदी देखील मान्य केली आहे विकर्ण हा दुर्योधन

व दु:शासनाचा भाऊ पण त्यांच्याप्रमाणे तो नीच नसून न्याय अन्यायाची विकर्णास जाण आहे. द्रौपदीची भर सभेत विटंबना होत असताना कोणीही बोलले नाही. भीष्म, द्रोण हे सर्व वडीलधारी लोक पण दुर्योधनास आवरले नाही. पण एकट्या विकर्णांनी भर सभेत पांडवांचा पक्ष घेत द्रौपदीची विटंबना करणे कसे अन्याय आहे हे स्पष्ट केले आहे. कुणीही सत्य बोलत नाही. खरे म्हणजे आजपर्यंत अनेकांनी द्युत खेळले. पण त्या दिवसात कोणीही आपल्या स्त्रीला लावल्याचे ऐकले नाही. तेव्हाही द्युत अन्यायपूर्ण आहे. असे वीकरणाने म्हणतात. सर्व सभेत विकर्णाचा जय जयकार झाला.

अशाप्रकारे विकर्ण सत्य, न्याय याचा चाहता होता. यावरून आपण शंभर कौरवात कसे वेगळे आहोत हे दाखवून दिले आहे. यांच्या पुसट अशा पण प्रभावी व्यक्तिरेखा या प्रसंगात आले आहेत. दुर्योधन अत्यंत कामातूर नीच व उद्धट दाखविला आहे. द्रौपदी किंकाळ्या फोडून रडताना दुर्योधन, शकुनी द्रौपदीच्या लावण्याचे कौतुक करून परस्परात टाळ्या देऊन हसत होते. द्रौपदीचे व आपले नाते दुर्योधन विसरला. वास्तविक विदुराने त्यास सुरुवातीस समजावले. परंतु विदुरावरच तो रागावला. द्रौपदीला भर सभेत आणल्यानंतर त्याने भर सभेत आपली मांडी उघडी करून तिला मांडीवर बसण्याचा संकेत दाखविला. एवढा दुर्योधन निर्लज्ज व नीच दाखवला आहे. ज्याप्रमाणे दुर्योधनाची प्रतिमा आहे, तशीच दु:शासनाची आहे. दुर्योधन नीच आहेच; पण दु:शासन बिनडोकही आहे. दुर्योधनाने म्हणताच त्यांनी द्रौपदीचे वस्त्रहरण सुरू केले. तो द्रौपदीशी झोंबाझोम्बी करतो. हंबरडा फोडून रडतानाही दु:शासनाला तिची दया आली नाही. अनंत वस्त्रे फेडून फेडून थकला. पण एवढी वस्त्रे कोठून येतात हे मात्र त्याला समजले नाही. अशा तऱ्हेने दु:शासन केवळ निर्लज्जच नाही तर बिनडोक आहे असे कवीने दाखविले आहे.

श्रीकृष्णाची व्यक्तीरेखा या प्रसंगात एखाद्या पडसावलीप्रमाणे आहे. द्रौपदीने कृष्णाचा जो धावा केला. त्यातून भक्तवत्सल कृष्णाचे रूप पाहवयास मिळते. दुष्टांचे पानिपत्य करणारा श्रीकृष्ण अनेक अवतार धारण करतो. असेही कवीने दाखविले आहे. श्रीकृष्णाने द्रौपदीचा धावा ऐकून तिला वस्त्रे पुरविली. भक्तांच्या हृदयात वास्तव्य करणाऱ्या श्रीकृष्णाची प्रतिमा अप्रत्यक्षपणे दाखवून कवीने चित्रीत केली आहे. या आख्यानात भीम दूर्योधन यांचा संवाद आहे किंवा द्रौपदीने दुर्योधनास जळजळीत शब्दात जो शाप दिला तो चित्त थरारक आहे. आपली विटंबना होताना द्रौपदीने त्या सभेत बसलेल्या भीष्म, धृतराष्ट्र या वडीलधाऱ्या मंडळींना जो सवाल केला त्या द्रौपदीचे तेजस्वी स्वरूप दिसते. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा जाब द्रौपदीने परखड शब्दात विचारून सर्वांनाच निरुत्तर केले. भीमाने दुर्योधनास व दु:शासनास आपल्या कथेच्या साह्याने योग्य वेळी योग्य उत्तर देईन असे जे म्हटले त्यातून भीमाची वीरश्री व निर्धार व्यक्त होतो. द्रौपदीने वस्त्रहरण प्रसंगी कृष्णाशी जो संवाद साधला त्यात उत्कट भक्तीरस आहे. द्रौपदीच्या शब्दात कारुण्य तर आहेच; पण कृष्णाला आळवताना करूण रस व भक्तीरसाचे रूप प्राप्त झाले आहे. या कथेच्या शेवटी धृतराष्ट्राने पांडव व द्रौपदीस समजावले. पुढील अनर्थ टळेल अशा समंजस शब्दात सर्वांचे सांत्वन केले.

थोडक्यात या कथेतील संवाद प्रत्येक पात्राच्या स्वभावावर प्रकाश टाकतात आणि कथानक गतिमान करतात हे मुक्तेश्वराचे खास वर्णनकौशल्य या काव्यात आढळते. मुक्तेश्वराने द्रौपदी वस्त्रहरण प्रसंग वर्णनात उत्कृष्ट प्रकारचा कल्पना विलास साधला आहे. उदाहरणार्थ द्रौपदीला धरून आणण्यासाठी दु:शासन तिच्या महालात आला. घाबरी झालेली द्रौपदी अंत:पुरातील वृद्ध स्त्रियांच्या मागे लपली त्याचे वर्णन करताना कवी लिहितो. हरीणी सांडोनिया पाशा। पळो पाहे दूर देशा। तेवी द्रौपदी राणीवसा। प्राण धाके संचेरा। ज्याप्रमाणे एखादी हरीणी पाश पसरलेले पाहून पळत सुटते त्याप्रमाणे द्रौपदी दु:शासनाच्या धरण्याच्या प्रयत्नापासून प्राणाच्या भयाने राणी वेशात पळू लागली.

तरी पण दु:शासनाने तिचे केस पकडलेच व तिला जमिनीवर पाडले. ज्याप्रमाणे एखाद्या माजलेल्या हत्तीने केळीचे झाड उलटून टाकावे तशी द्रौपदीची अवस्था झाली. या ठिकाणी कवीने सुंदर द्रौपदीच्या वर्णनासाठी हरीणीची व केळीच्या झाडाची सुंदर उपमा दिली आहे. ज्याप्रमाणे वाघ एखाद्या गाईला आपल्या गुहेत नेतो त्याप्रमाणे त्या निर्दय व क्रूर दू:शासनाने गरीब बिचाऱ्या द्रौपदीला भर सभेत आणले. असंख्य हत्तीच्या गर्दीत ज्याप्रमाणे एखादा सिंहगर्जना करून प्रवेश करतो. त्याप्रमाणे विकर्ण भर सभेत तेजस्वी शब्दात बोलला आणि त्यांनी सत्त्यावर प्रकाश टाकला किंवा कोट्यावधी बोकडांना एकटा वाघ ज्याप्रमाणे फाडून खातो त्याप्रमाणे वीकर्णाने भर सभेत सर्वांचाच दम आणि ढोंग प्रकाशात आणला. रूपक हा मुक्तेश्वराचा आवडता अलंकार आहे. द्रौपदीने जळजळीत शब्दात दुर्योधनाला शाप दिला. त्या प्रसंगाचे वर्णन कवीने रूपकात्मक केले आहे. द्रौपदी दुर्योधनास उद्देशून बोलते भीमा करी जे केळवली। गदानावरी सुगणास्थळी।। वाड़निश्चये तुज नेमिली। गोत्र धटित निर्धारे।। बहुले योजिले रणतळवट। आयुष्य अवनिया अंगपाट।। हाते सारूनी बळी वरिष्ठ। लग्न लावीन स्वहस्ते।। रक्त हरिद्रा तनुलेपणी। माथा अक्षता पाय पिटणी।। स्त्रीया प्रलाप वाघ्रध्वनी। सुख सोहळा भोगिसी।। ते गदा घेऊनी मांडीवरी। रणमंचकी निद्रा करी।। प्राण पारखे दवडुनि दुरी। मय एकांनी पहुडे का।। पुढती जागा नव्हसी कदा। ऐकोनी शापोक्ती अनुवाद।। दुर्योधन चढला क्रोधा। काळ खवळे ज्यापरी।। भीम पुढे चालून आपल्या गधेने दुर्योधनाच्या मांडीवर प्रहार करून त्याची मस्ती उतरवणार आहे. हे वर्णन करताना कवीने त्यावर लग्नाचे रूपक केले आहे. भीमाची गदा हीच नवरी असून तिचा दुर्योधनाच्या मांडीशी विवाह होणार आहे. तो विवाह रणांगणरुपी भोवल्यावर होणार आहे. या लग्नात नवऱ्याला रक्तरुपी हळद लावण्यात येईल. भिमाच्या लाथा, बुक्क्यांनी दुर्योधनावर अक्षता पडेल आणि या लग्नातील वाघ म्हणजे दुर्योधनाच्या स्त्रियांचा विजय होईल. हे दुर्योधन त्याप्रसंगी रणांगणरुपी मंचकावर भिमाच्या गदेला मांडीवर घेऊन खुशाल झोपी जाशील.

अशाप्रकारे लग्नाचे रूपक वापरून दुर्योधनाच्या भावी मृत्यूचे भयानक शाप कवीने द्रौपदीच्या मुखातून व्यक्त केले आहे. शोकाकुल झालेली द्रौपदी श्रीकृष्णाचा धावा करते. त्याही प्रसंगी कवींनी सुंदर रूपकांची योजना केली आहे. तुची गे माझी कुलस्वामिनी। मातस तुळजापूर वासिनी। कौरव महिषासुरमर्दिनी। धावे पावे धावूणिया।। वरील ओवीत कवीने श्रीकृष्णावर तुळजापूरच्या देवीचे रूपक केले आहे. द्रौपदीचे मन म्हणजेच तुळजापूर येथील देवीने कौरव रुपी महिषासुरास मारण्यासाठी प्रकट व्हावे अशी विनंती द्रौपदी ने केली आहे. विष्णूने जे दहा अवतार घेतले त्या अवतारांची रूपके मिळून कवीने द्रौपदीच्या मनातील करून भाव व्यक्त केला आहे. उदाहरणार्थ दु:शासन शंख वहिला। स्मरता संतोष वेद हरविला।। कौरव सागरी बुडविला। तो कवनाते न काढवे।। मत्स्यरुपी नारायणा। धावे पावे मधुसूदना। विभांडूनी याचीया वचना। समाधान मज द्यावे।। ज्याप्रमाणे विष्णूने मच्छ अवतार धारण करून शंकासुराचा नाश केला व वेदाचे रक्षण केले. त्याप्रमाणे हे कृष्णा या दु:शासनरूपी शंकासुराचा नाश कर व कौरवरुपी सागरात हरवलेले माझे समाधान रुपी वेद तुझ्याशिवाय कुणीही रक्षण करू शकणार नाही. कौरवरुपी समुद्रात माझा मंदिराचल पर्वत बुडू लागला आहे. तेव्हा हे केशवा याप्रसंगी तू कासव हो आणि माझी लाज राख. कौरव रुपी हिरण्याक्ष तिला रसातळाला नेत आहे. अशा प्रकारची रूपके घेऊन नरसिंह, वामन, परशुराम, राम, श्रीकृष्ण या अवतारांची रूपके घेऊन कवीने द्रौपदीचा करून धावा व्यक्त केला आहे. हे श्रीकृष्णा माझे मन म्हणजे सरोवर आहे. त्या मनातील तुझ्याविषयीचे उत्कट प्रेम म्हणजेच जणू काही त्या सरोवरातील सुंदर कमळाची फुले आहेत. श्रीकृष्ण रुपी राजहंसा तू त्या कमळातील मकरंदाचा आस्वाद घेण्यासाठी नेहमीच क्रीडा करतोस मग आजच काय झाले. आज तू कुठे चरावयास गेला आहेस असे सुंदर

रूपक घेऊन कवीने द्रौपदीच्या करून भावनांना भक्तीरसाचे कोंदण प्राप्त करून दिले आहे. माझे मानस सरोवर। प्रेम कल्हारी सुमन हार। राजहंस रुक्मिणीवर। सदा स्वानंदे क्रीडातू।। आजी गेलास कवणे ठाया। मुक्त मुक्ताफळे चरावया। गोविलासी म्हणोनी माया। माझी तुवा सांडिली।। द्रौपदीचा धावा ऐकून द्वारकेतील कृष्णाला खडबडून जाग आली. द्वारकेत श्रीकृष्ण सुखाने झोपला होता. कवी द्वारकेचे वर्णन पुढील प्रमाणे करतो. द्वारका म्हणजे जणू काही निर्गुण भक्तीचे स्थान होते तेथे निर्वीकल्प उद्याने हृदयरूपी रत्नांचे महाल आणि समाधीची शय्या होती त्या द्वारकेत ज्या महालात कृष्ण झोपला होता. तो महाल म्हणजे जणू काही भगवान शंकराचे मनच होय. अशा तऱ्हेचे रूपक मिश्रित उत्प्रेक्षा कवीने साधली आहे.

अशा तऱ्हेच्या द्वारकेत कृष्ण झोपला होता आणि रुक्मिणी त्याचे पाय चेपीत होती. कृष्णाचे तळवे लालसर होते. म्हणूनच की काय रुक्मिणीच्याही हाताचे तळवे लालसर दिसत होते. हरीच्या पावलाचा लालसर रंग रुक्मिणीच्या हाताला लागला होता असे वर्णन करून श्रीकृष्ण व रुक्मिणी यांची उत्कट प्रीती कोमल सौंदर्य याची एकत्रित वर्णने साधली आहेत. मुक्तेश्वर आणि श्रीकृष्ण खडबडून जागा झाला आणि त्याने द्रौपदीवर संकट आल्याचे जाणवताच तो अतिशय वेगाने द्रौपदीच्या पाठराखणी करता आला. कवी म्हणतो त्यावेळी त्यांनी वायू गरुड व मन या तिघांनाही बाजूला सारले व तो वेगात आला अशी सुंदर कल्पना वापरून कवीने कृष्ण किती वेगात आला ते सुचित केले. श्रीकृष्णाने द्रौपदीस किती विविध रंगाची व कलाकुसर असलेली भरजरी किमती वस्त्रे पुरवली यात मुक्तेश्वराच्या कल्पनाशक्तीची हौस दिसून येते. फुलांच्या रंगाची पक्षाच्या रंगाची आणि मुक्तेश्वर काळातील बाजारपेठांची नावे या वर्णनात कवीने घेतली आहेत त्या वस्त्रावर मच्छर पूर्ण इत्यादी अवतारांची लीला चित्रीत होती थोडक्यात मुक्तेश्वरांच्या या आख्यानात सुंदर कल्पनाविलास आहे. काही ठिकाणी काही प्रसंगाची अतिशय सुंदर चित्रण कवीने केले आहे. की, जे स्वाभाविक वाटते. उदाहरणार्थ रजस्वला हो एक अंबरीन ढळता वक्ष स्थळीचा पदर पाणी तळे पायोधरा अच्छा दुनी आक्रंदे द्रौपदीच्या करून स्थितीचे व हालचालीचे अतिशय सुंदर चित्र येथे कवीने रेखाटले आहे. अशा प्रकारची सुंदर स्थळे या आख्यानात विखुरली आहेत. या काव्यात मुक्तेश्वरकालीन वस्त्र, प्रावरणाची वर्णने आली आहेत. कवीच्या करुणेचेही प्रतिबिंब काव्यात कसे आहेत हे यातून दिसून येते. तसेच एक सूचक दृष्टांत आला आहे श्रीकृष्ण मुक्तपणे आला आणि त्याने संकट निवारण केले. याचा पांडवांना अतिशय आनंद झाला. तो आनंद कसा होता याचे वर्णन करताना कधी लिहितो अंतरी भ्रताराचे सुख बाहेरी सासुरवासाचे दुःख न वाटे। तेवी तुम्ही हरिक। भोग माझोनी चिंतने। सासुरवासाचे दुःख असले तरी अंतरंगात पती दुःखाचा, पती सुखाचा आनंद भोगणाऱ्या स्त्रीचा तत्कालीन संदर्भ देऊन श्रीकृष्णाचे पांडवावरील प्रेम व्यक्त केले आहे. अशा तऱ्हेने कल्पनाविलासाबरोबरच तत्कालीन सामाजिक संदर्भ या काव्यात आले आहेत.

**संदर्भग्रंथ :-**

१) (प्रकाशक) अ.का. प्रियोळकर, 'मुक्तेश्वरी महाभारत', कार्यवाह, मराठी संशोधनसमिती, मुंबई, १९५१
२) (संपादक) प्रा. भालबा केळकर, 'संपूर्ण महाभारत', वरदा सेनापती बापट मार्ग, नवी आवृत्ती, १९८२
३) डॉ. यशवंत साधुसर यांनी २००२ मध्ये केलेले मार्गदर्शन.